0001

<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

<u>वाचा</u> :- १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विनोबा भावे नगर पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक ११/०७/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५२/२०११/जा.६१३ दिनांक २९/०७/२०११, २४/०८/२०११, ०३/०९/२०११, १४/०९/२०११, २२/०९/२०११, १४/१०/२०११, २०/१०/२०११ व ३१/१०/२०११.

३) झीग्मा गॅस सर्व्हिस मालक सलिम पोटिया व मॅनजेर जावेद अहमद खान, जनाउद्दीन जलाउद्दीन खान यांचे दि.०९/०८/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले स्वतंत्र लेखी निवेदन.

४) झीग्मा गॅस सर्व्हिसचे मालक सलिम पोटिया, टेम्पो क्र.एमएच-०४-डिएस-४५९२ चे मालक मुबारक अली मो. इस्माईल शेख, टेम्पो क्र.एमएच-०३-एन-८९९७ तसेच टेम्पो क्र.एमएच-०३-अेएच-१३११ चे मालक जनाउद्दीन जलाउद्दीन खान, अयुब ताजेमोहम्मद खान गॅस डिलीव्हरी करणारा, लतीफ जलाउद्दीन खान गॅस डिलीव्हरी करणारा, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चा चालक कासम मो. खान, सलीम हाजीभाई मुलतानी वॉचमन, ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९ चे मालक शरनजीन बक्षी सिंग, ट्रक क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ चे मालक दिपक बाबाराव जाधव यांचे दि.१६/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

५) टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ चे मालक शशीकांत एम. लाटे यांचे टपालामार्फत प्राप्त झालेले दि.३०/०८/२०११ रोजीची लेखी निवेदन.

६) झीग्मा गॅस सर्व्हिस मालक सलिम पोटिया तसेच लक्ष्मी गॅस सर्व्हिसचे भागीदार यांचे दि.३०/०८/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले स्वतंत्र लेखी निवेदने.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विनोबा भावे नगर पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक १६/०८/२०११ चे अभिवेदन व दि.०८/०९/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

८) लक्ष्मी गॅस सर्व्हिस यांचे दि.२०/०९/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.

९) विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश एम. सिंग यांचे दि.१९/१०/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

१०) विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश एम. सिंग यांचे दि.२५/१०/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

क्र.निशि/अंमल/प्र.क्र.५२/२०११/जा. 9032
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक :२७/१२/२०११.

## <u>आदेश</u>

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

<u>प्रकरणाची पार्श्वभूमी</u> :-

गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांना दिनांक ०२/०७/२०११ रोजी गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, बि.एम.के. कंम्पाउन्ड, क्रांती नगर, महेन्द्र दोषी यांच्या गाळ्यासमोर, बैल बाजार, कुर्ला (प), मुंबई या ठिकाणी

१) रजीउल्ला २) अग्याराम व ३) सोहेल या इसमांनी शासन दराने ग्राहकांना घरगुती वापरात वितरीत होणारे गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात अवैधरित्या विनापरवाना साठा करुन ठेवला असून सदर ठिकाणी ते त्यांच्या साथीदारांसह घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाकीमधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढून सदर गॅस वॉलच्या सहाय्याने व्यावसायिक गॅस टाकीमध्ये गॅस कमी प्रमाणात भरुन सदर टाकीमध्ये पूर्ण गॅस भरलेला आहे असे भासवून सदर गॅस टाक्या ग्राहकांना विक्रीसाठी तयार करुन ठेवल्या आहेत. तसेच सदर ठिकाणी घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाक्यांच्या मोठ्या प्रमाणात अवैधरित्या साठा करुन ठेवला आहे. म्हणून सदर बातमीची शहानिशा करुन कारवाई करण्यासाठी पोलिस पथक गुन्हे शाखा नियंत्रण येथून सकाळी १०:०० वाजता उक्त ठिकाणी पोहचले. सदर ठिकाणी विनोबा भावे नगर पोलिस ठाणेचे पथक, शिधावाटप यंत्रणेतील अधिकारी तसेच दोन पंचाना १४:०० वाजता बोलावण्यात आले.

त्यानंतर पोलिस पथक, शिधावाटप अधिकारी व पंच यांनी नमूद गाळ्यामध्ये प्रवेश केला असता, एक इसम व्यावसायीक गॅस टाकी खाली ठेवून त्या टाकीच्या तोंडामध्ये लोखंडी वॉल टाकून वॉलच्या दुसऱ्या तोंडास घरगुती वापरण्यात येणारे भरलेले सिलेंडर उलटे करुन घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाकीमधून गॅस व्यावसायीक सिलेंडरमध्ये भरताना दिसून आला. तसेच दुसरा इसम भरलेल्या व्यावसायीक सिलेंडरच्या टाकीच्या तोंडास एच.पी. कंपनीचे प्लास्टिकचे सिल लावून सदर सिलवर गरम पाणी टाकून सिल करीत असताना दिसून आला. तसेच तिसरा इसम सदर सिल केलेले सिलेंडर उचलून बाजूला लावून ठेवत असताना दिसून आला. सदर इसमांना पोलिसांनी त्यांची कृती थांबविण्यास सांगून तीनही इसमांना त्यांची नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) रजीउल्ला एनउल्ला खान, २) अग्याराम रामलखन बिमल व ३) सोहेल शमीम खान असे सांगितले.

सदर इसमांच्या संमतीने नमूद गाळ्याची तपासणी केली असता, सदरहू गाळ्यामध्ये गॅस सिलेंडर दुसऱ्या सिलेंडरमध्ये भरण्यासाठी लागणारे साहित्य व इतर माल व तयार झालेला माल वाहतूक करण्यासाठी सदर गाळ्याच्या बाहेर उभा असलेला टेम्पो मिळून आला.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबधितांनी संगनमत करुन शासनातर्फे अनुदानित दराने गॅस ग्राहकांना वितरीत होणाऱ्या घरगुती गॅसच्या टाक्यामधून वॉलद्वारे गॅस काढून सदर गॅस व्यावसायीक सिलेंडरमध्ये क्षमतेपेक्षा कमी भरुन तो पूर्ण गॅस भरला असल्याचे भासवून ग्राहकांना विक्रीसाठी बेकायदेशीररित्या व विनापरवाना स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता साठा करुन ठेवला, तसेच मानवी जिवीतास धोका निर्माण केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) भा. दं. वि. चे कलम ४२०, २८५, ३४ (२) लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ३ (अ), (ब), ६, ७ सह (३) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२), ८ चा भंग केल्यावरुन

त्यांचेविरुध्द विनोबा भावे पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०५/२०११, दिनांक ०२/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले १७ व्यावसायीक सिलेंडर | १७ नग | ५१,४२५/- |
| २ | भारत कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ४ व्यावसायीक सिलेंडर | ४ नग | ६,८००/- |
| ३ | एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे १६ व्यावसायीक सिलेंडर | १६ नग | २७,२००/- |
| ४ | एच.पी. कंपनीचे १४ किलो वजनाचे २४ घरगुती वापराचे येणाऱ्या सिलेंडरच्या रिमाम्या टाक्या | २४ नग | ३०,०००/- |
| ५ | एच.पी. कंपनीचे १४ किलो वजनाचा घरगुती वापरात येणारी एक सिलेंडरची भरलेली टाकी | १ नग | १,६५२/- |
| ६ | वर नमूद गॅस सिलेंडर वाहतूक करण्यासाठी लागणार टाटा एस या कंपनीचा चार चाकी टेंम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ | १ नग | १,५०,०००/- |
| ७ | लोखंडी वॉल (नोझल) | १५ नग | २,२५०/- |
| ८ | एच.पी. कंपनीचे प्लास्टिक पेपरचे सिल | ५० नग | १००/- |
| ९ | वजन काटे | २ नग | १,०००/- |
| १० | दोन बर्नल असलेली १ शेगडी १ रेग्युलेटर व १ पाईप | - | १,५००/- |
| | | एकूण | २,७१,९२७/- |

ताब्यात घेतलेला इसम नामे रजीउल्ला खान यांच्याकडे अधिक विचारणा केली असता, घरगुती वापरण्यात येणारे गॅस सिलेंडर तो झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी, पंतनगर, घाटकोपर, मुंबई या गॅस एजन्सीमधील डिलीव्हरी करणाऱ्या इसमाकडून प्रति किंमत रुपये ५००/- ने विकत घेत असल्याचे सांगून २५ घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरमधून गॅस काढून सदर गॅस व्यावसायीक सिलेंडरमध्ये भरुन १७ व्यावसायीक सिलेंडर तयार केले जातात. सदर तयार केलेले सिलेंडर तो वर नमूद टेम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ मधून साकीनाका येथे इसम नामे जनाउद्दीन जलाउद्दीन खान यास रुपये १०००/- या दराने विकत असल्याचे सांगून नमूद टेंम्पो चालक पोलिसांना पाहून पळून गेल्याचे सांगितले. तसेच जप्त करण्यात आलेल्या एच.पी. व भारत कंपनीच्या सीलबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, सदरचे सील त्याने १ महिन्यापूर्वी फिरोज नावाच्या त्याच्या मित्राकडून विकत आणल्याचे सांगितले.

दिनांक ०३/०७/२०११ रोजी पोलिसांच्या ताब्यात असलेला इसम नामे जानुउद्दीन जलाउद्दीन खान यांना पोलिसांनी पंचासमक्ष सदर गुन्ह्याबाबत काही सांगावयाचे आहे काय ? असे विचारणा केली असता. त्याने पंचासमक्ष स्वखुशीने खालील निवेदन दिले.

0004 " मैने रजीउल्ला नाम के आदमीसे उसने डोमेस्टीक गॅस सिलेंडरसे गॅस निकालकर कमर्शियल गॅस सिलेंडर के बाटले में भरे हुऐ कमर्शियल गॅस सिलेंडर के और डोमॅस्टिक गॅस सिलेंडर के बाटले खरीदे है वह गॅस सिलेंडर मैने साकीनाका, ९० फिट रोड के आसपास जिस जगह पे टेंम्पो में रखे हुए है वह जगह दिखाकर सिलेंडर निकालकर देता हूँ। मेरे साथ चलो "

वरील प्रमाणे आरोपीने केलेल्या निवेदनानंतर पंच, पोलिस पथक हे आरोपीसह विनोबा भावे नगर पोलिस ठाणेच्या सरकारी वाहनामधून उक्त ठिकाणी निघाले. उक्त ठिकाणी पोहचल्यानंतर आरोपीने पथकास सदर कम्पाउन्डच्या पूर्व बाजूस असलेल्या गेटजवळ असलेल्या मोकळ्या जागेत उघड्यावर ठेवण्यात आलेले गॅस सिलेंडर तसेच नमूद कम्पाउन्डच्या पूर्वेकडील भिंतीला लागून उभ्या असलेल्या १) तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२, २) टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२, ३) टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ व ४) मॅक्स टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१३११ तसेच ५) एक पिवळ्या रंगाचा डंपर ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९ या वाहनांमध्ये ठेवलेले गॅस सिलेंडर दाखविले व सदरचे गॅस सिलेंडर त्याने रजीउल्ला याच्याकडून विकत घेतल्याचे पोलिस अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. पोलिसांनी सदर वरील वाहनात ठेवण्यात आलेले व मोकळ्या जागेत जमिनीवर असलेले खालील वर्णनाचे व कंपन्यांचे सिलेंडर व वाहने पंचनाम्या अंतर्गत हस्तगत केले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | कम्पाउन्डच्या गेटजवळ व मोकळ्या जागेत जमिनीवर ठेवलेले एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ४८ व्यावसायीक व भारत कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ८ व्यावसायीक सिलेंडर | ५६ नग | ९५,२००/- |
| २ | पिवळ्या रंगाचा डंपर ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९ | १ नग | २,५०,०००/- |
| ३ | उक्त ट्रकमधील एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे २७ व्यावसायीक व भारत कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ४ व्यावसायीक सिलेंडर | ३१ नग | ५२,७००/- |
| ४ | उक्त ट्रकमधील एच.पी. कंपनीचे ४७ किलो वजनाचे रिकामे १० व्यावसायीक गॅस सिलेंडर | १० नग | २५,०००/- |
| ५ | जीसी बजाज कंपनीचा टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ | १ गन | ८०,०००/- |
| ६ | उक्त ट्रकमधील एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ४ व्यावसायीक व भारत कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामा १ व्यावसायीक गॅस सिलेंडर | ५ नग | ८,५००/- |
| ७ | उक्त ट्रकमधील एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले २ व्यावसायीक व भारत कंपनीचे १९ किलो वजनाचा भरलेला १ व्यावसायीक सिलेंडर | ३ नग | ९,०७५/- |
| ८ | टाटा अेसीई कंपनीचा टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ | १ नग | ३,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | उक्त ट्रकमधील एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले ८ व्यावसायीक व भारत कंपनीचे १९ किलो वजनाचा भरलेले २ व्यावसायीक सिलेंडर | १० नग | ३०,२५०/- |
| १० | उक्त ट्रकमधील एच.पी. कंपनीचे १४ किलो वजनाचे भरलेले १० घरगुती गॅस सिलेंडर | १० नग | १६,५००/- |
| ११ | महिन्द्रा जीप क्र. एमएच-०३-अेएच-१३११ | १ नग | ३,००,०००/- |
| १२ | उक्त जीपमधील एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले ५० व्यावसायीक गॅस सिलेंडर | ५० नग | १,५१,२५०/- |
| १३ | एफ फोर्स कंपनीचा टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ | १ नग | १,२५,०००/- |
| १४ | उक्त टेम्पोमधील एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले १२ व्यावसायीक गॅस सिलेंडर व भारत कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले ४ व्यावसायीक गॅस सिलेंडर | १६ नग | ४८,४००/- |
| १५ | उक्त टेम्पोमधील एच.पी. कंपनीचे १४ किलो वजनाचे भरलेले २ घरगुती गॅस सिलेंडर | २ नग | ३,३००/- |
| १६ | उक्त टेम्पोमधील एच.पी. कंपनीचे १४ किलो वजनाचे रिकामे ७ घरगुती गॅस सिलेंडर | ७ नग | ८,४००/- |
| | | एकूण | १५,०३,५७५/- |

सदर ठिकाणी काही इसम हजर असून नमूद हजर असलेल्या इसमांबाबत पोलिसांनी पंचासमक्ष विचारणा केली असता इसम नामे लतीफ जलालउद्दीन खान हा नमूद आरोपीचे गॅस डिलीव्हरी करणारा इसम असल्याचे सांगितले, तसेच इसम नामे कासम मोहम्मद खान हा सदर आरोपीचा गॅस डिलीव्हरी करणारा इसम असून वर नमूद टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ या वाहनाचा चालक असल्याचे सांगितले. तसेच इसम नामे अयुब राजमोहम्मद खान हा आरोपीकडे कॅशिंयर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले व इसम नामे सलीफ हाजीभाई मुलतानी हा आरोपीचा सदरचा व्यवसाय सांभाळत असल्याचे सांगितले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, विनोबा भावे नगर पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०५/२०११ दि.०२/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि. १६/०८/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ तसेच टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१३११ चे मालक जनाउद्दीन जलाउद्दीन खान, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चे मालक मुबारक अली

मो. इस्माईल शेख, सलीम हाजीभाई मुलतानी वॉचमन, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चा चालक कासम मो. खान, लतीफ जलाउद्दीन खान गॅस डिलीव्हरी करणारा, अयुब ताजेमोहम्मद खान गॅस डिलीव्हरी करणारा, झीग्मा गॅस सर्व्हिसचे डिलिव्हरी मॅन जावेद अब्दुल रजाक ख्वाजा हे मालकाच्या वतीने, ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९ चे मालक शरनजीन बक्षी सिंग तसेच ट्रक क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ चे मालक दिपक बाबाराव जाधव हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

जप्त टेम्पो/ट्रकचे मालक, चालक तसेच वॉचमन यांनी सुनावणीच्या वेळी दिलेल्या निवेदनात ते लक्ष्मी गॅस एजन्सी यांचेकडे काम करीत असल्याचे नमूद केले असल्याने लक्ष्मी गॅस एजन्सीचे मालक यांना तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित न राहिल्याने यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दि.३०/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/०८/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, पुढील सुनावणी दि.१३/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. झीग्मा गॅस एजन्सीच्या वतीने ॲड. राजीव हिंगू वकालतनाम्यासह, लक्ष्मी गॅस एजन्सीचे मालक श्रीमती सोनल कल्पक शाह तसेच तपासी पोलिस अधिकारी श्री. पाटील हे उपस्थित राहिले. सुनावणीस उपस्थित लक्ष्मी गॅस एजन्सीचे मालक श्रीमती सोनल शाह यांनी विस्फोटक परवाना व इतर तत्सम परवाने सादर केले नाहीत. तसेच त्यांनी लतिफ जलाउद्दीन खान हे गेल्या ४ ते ५ वर्षापासून त्यांच्याकडे काम करीत असल्याचे सांगितल्याने याबाबतचे दस्ताऐवज सादर करण्याकरिता तसेच सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.२०/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०९/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, पुढील सुनावणी दि.११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दरम्यान वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विनोबा भावे पोलिस ठाणे यांचे दि.०८/०९/२०११ रोजीचे वाचावे क्र. ७ अन्वये प्राप्त झालेले पत्र व त्यासोबत असलेला पंचनामाचे अवलोकन केले असता, प्रस्तूत गुन्ह्यातील जामीनावर मुक्त असलेला आरोपी नामे जानऊद्दीन खान यास दि.२१/०७/२०११ रोजी पोलिस ठाणेस बोलावून तो बनावटीकरण केलेले गॅस कोणास पुरवित होता, याबाबत तपास केला असता, त्याने सदरचे गॅस काही एच.पी. ग्राहकांना तसेच काही विकास गॅस एजन्सीचे मालक अंखिलेश सिंग यांना पुरवीत असलेबाबत सांगितले. सदरबाबत आरोपी नामे जानउद्दीन खान यांचा जबाब नोंदवून जानुउद्दीन खान याचेकडून मिळालेल्या माहितीनुसार ९० फुट रोड येथील श्रीकृष्ण नगर याठिकाणी जावून विकास गॅस एजन्सीचे कार्यालयाबाबत तपास केला असता, सदर ठिकाणी गुलशन हॉटेल शेजारी असणाऱ्या गल्लीजवळ काही गॅस सिलेंडरने भरलेला एक तीन चाकी टेम्पो तसेच

RATIONING & ... MUMBA

विकास गॅस एजन्सीचे कार्यालय दिसून आले. सदर विकास एजन्सीचे मालक अखिलेश सिंग यांना खान यांनी पुरविलेल्या १९ किलो वजनाच्या व्यावसायीक गॅस सिलेंडरबाबत तपास केला असता, त्याने खान याचेकडून विक्री करण्याकरिता विकत घेतलेले रिकामे सिलेंडर दाखविल्याने दोन पंचासमक्ष पंचनामा करुन तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० व एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ६ व भारत गॅस कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे १ व्यावसायीक सिलेंडर असा एकूण रुपये १,११,९००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

सबब, दि.२१/०७/२०११ रोजी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाशी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि. ११/१०/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१८/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ९ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.२५/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २५/१०/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, पुढील सुनावणी दि.०८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग उपस्थित राहिले व इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

__युक्तिवाद :-__

झीग्मा गॅस सर्व्हिस मालक सलिम पोटिया व मॅनजेर जावेद अहमद खान यांनी दि.०९/०८/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या स्वतंत्र निवेदनात, नमूद गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले ट्रक/टेम्पो तसेच घरगुती

वापराचे सिलेंडर इत्यादी मुद्देमाल त्यांच्या मालकीचा नसून सदर मुद्देमालाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याने नियमानुसार कारवाई करण्यात यावी, असे नमूद केले आहे.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस झीग्मा गॅस सर्व्हिसचे मालक सलिम पोटिया यांच्या वतीने मॅनेजर जावेद ख्वाजा हे प्राधिकार पत्रासह उपस्थित राहून मालकाच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात, नमूद गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले ट्रक/टेम्पो तसेच घरगुती/ वापराचे सिलेंडर इत्यादी मुद्देमाल त्यांच्या मालकीचा नसून सदर मुद्देमालाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याने नियमानुसार कारवाई करण्यात यावी, असे नमूद केले आहे.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चे मालक मुबारक अली मो. इस्माईल शेख यांनी युक्तीवाद केला की, ते टाटा टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चे मालक असून त्यांनी सदरचा टेम्पो लक्ष्मी गॅस एजन्सी यांना भाडेतत्त्वावर दिलेला आहे. त्यांनी रजिउल्ला एनउल्ला खान यांच्याकडून कोणतेही गॅस सिलेंडर विकत घेतले नसून त्यांच्याशी असलेल्या व्यावसायीक भांडणातून लक्ष्मी गॅस एजन्सी यांचे नाव घेतल्याने त्यांच्या मालकीचा टेम्पो पार्कीगमध्ये सिलेंडर भरुन उभा असतांना पोलिसांनी जप्त केलेला आहे. तथापी, त्यांच्याकडे गाडीचे सर्व कागदपत्र उपलब्ध असून सदर गुन्ह्यामध्ये त्यांना जाणूनबूजूण घेण्यात आलेले आहे.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित जनाउद्दीन जलाउद्दीन खान यांनी ते टेम्पो क्र.एमएच-०३-एन-८९९७ तसेच टेम्पो क्र.एमएच-०३-अेएच-१३११ चे मालक असल्याचे सांगितले. तथापी, त्यांनी निवेदनासोबत टेम्पो क्र.एमएच-०३-अेएच-१३११ याबाबत परिवहन विभागाचे श्री. हय्याद अली अब्दुल खान यांचे नावे असलेले नोंदणीकृत प्रमाणपत्र व त्यांच्या समवेत असलेले सदर टेम्पोचे विक्री करारनामा सादर केले. तसेच टेम्पो क्र.एमएच-०३-एन-८९९७ या टेम्पोबाबत परिवहन विभागाचे त्यांचे नावे असलेले नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करुन युक्तीवाद केला की, त्याची गाडी क्र.एमएच-०३-अेएच-१३११ ही नाक्यावर उभी होती व ती लक्ष्मी गॅस यांना भाड्यावर दिली होती. त्याची गाडी त्याने कोणत्याही वाईट उद्देशासाठी दिली नव्हती. सदर गाडीची बँकेचे हफ्ते भरणे बाकी आहेत. सदर गाडीवरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने सदर गाडी त्याला परत करावी. तसेच टेम्पो क्र.एमएच-०३-एन-८९९७ चे ते मालक असल्याचे सांगून त्यांनी सदरचा टेम्पो लक्ष्मी गॅस एजन्सी यांना दिल्याचे सांगून त्यांचा टेम्पो सिलेंडर भरुन पार्किगमध्ये उभा असतांना पोलिसांनी ताब्यात घेतला, असे सांगून तसे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले. तसेच दि.०९/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, रजिउल्ला एनउल्ला खान यांनी त्यांचे नाव सदर गुन्ह्यामध्ये खोटेपणाने घेतले असून ते लक्ष्मी गॅस एजन्सी येथे डिलीव्हरी मॅन म्हणून काम करीत असून त्यांनी रजिउल्ला एनउल्ला खान यांच्याकडून कोणतेही सिलेंडर खरेदी केलेले नसून केवळ व्यावसायीक भांडणामुळे सदर गुन्ह्यामध्ये त्यांचे नाव गोवले गेले आहे, असे नमूद केले आहे.

RATIONING ... HEAD OFFI... MUMBAI

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अयुब ताजेमोहम्मद खान लक्ष्मी गॅस एजन्सीमध्ये गॅस डिलीव्हरी करणारा यांनी युक्तीवाद केला की, रजिउल्ला एनउल्ला खान यांनी त्यांचे नाव सदर गुन्ह्यामध्ये खोटेपणाने घेतले असून ते लक्ष्मी गॅस एजन्सी येथे डिलीव्हरी मॅन म्हणून काम करीत असून त्यांनी रजिउल्ला एनउल्ला खान यांच्याकडून कोणतेही सिलेंडर खरेदी केलेले नसून केवळ व्यावसायीक भांडणामुळे सदर गुन्ह्यामध्ये त्यांचे नाव गोवले गेले आहे. तसेच ते घरगुती सिलेंडरमधून व्यावसायीक सिलेंडरमध्ये गॅस टाकण्याचे कोणतेही अनधिकृत कृत्यामध्ये ते सामिल नसल्याचे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित लतीफ जलाउद्दीन खान लक्ष्मी गॅस एजन्सीमध्ये गॅस डिलीव्हरी करणारा यांनी युक्तीवाद केला की, रजिउल्ला एनउल्ला खान यांनी त्यांचे नाव सदर गुन्ह्यामध्ये खोटेपणाने घेतले असून ते लक्ष्मी गॅस एजन्सी येथे डिलीव्हरी मॅन म्हणून काम करीत असून त्यांनी रजिउल्ला एनउल्ला खान यांच्याकडून कोणतेही सिलेंडर खरेदी केलेले नसून केवळ व्यावसायीक भांडणामुळे सदर गुन्ह्यामध्ये त्यांचे नाव गोवले गेले आहे. तसेच ते घरगुती सिलेंडरमधून व्यावसायीक सिलेंडरमध्ये गॅस टाकण्याचे कोणतेही अनधिकृत कृत्यामध्ये ते सामिल नसल्याचे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चा चालक कासम मो. खान यांनी युक्तीवाद केला की, रजिउल्ला एनउल्ला खान यांनी त्यांचे नाव सदर गुन्ह्यामध्ये खोटेपणाने घेतले असून ते लक्ष्मी गॅस एजन्सी येथे चालक म्हणून काम करीत असून त्यांनी रजिउल्ला एनउल्ला खान यांच्याकडून कोणतेही सिलेंडर खरेदी केलेले नसून केवळ व्यावसायीक भांडणामुळे सदर गुन्ह्यामध्ये त्यांचे नाव गोवले गेले आहे. तसेच ते घरगुती सिलेंडरमधून व्यावसायीक सिलेंडरमध्ये गॅस टाकण्याचे कोणतेही अनधिकृत कृत्यामध्ये ते सामिल नसल्याचे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सलीम हाजीभाई मुलतानी लक्ष्मी गॅस एजन्सीमधील वॉचमन यांनी युक्तीवाद केला की, रजिउल्ला एनउल्ला खान यांनी त्यांचे नाव सदर गुन्ह्यामध्ये खोटेपणाने घेतले असून ते लक्ष्मी गॅस एजन्सी येथे वॉचमन म्हणून काम करीत असून त्यांनी रजिउल्ला एनउल्ला खान यांच्याकडून कोणतेही सिलेंडर खरेदी केलेले नसून केवळ व्यावसायीक भांडणामुळे सदर गुन्ह्यामध्ये त्यांचे नाव गोवले गेले आहे. तसेच ते घरगुती सिलेंडरमधून व्यावसायीक सिलेंडरमध्ये गॅस टाकण्याचे कोणतेही अनधिकृत कृत्यामध्ये ते सामिल नसल्याचे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०२-वायए-९७२९ चे मालक शरनजीन बक्षी सिंग यांनी युक्तीवाद केला की, ते कसारा डॅम साईट येथे काम करीत असून पावसाळ्यात त्यांचे सदरचे ट्रक काही काम नसल्याने चार महिन्याकरिता मुंबईत घेऊन येत असल्याचे सांगून या कालावधीमध्ये ते सदर ट्रकचे

डागडुगी व पेटिंगचे काम पूर्ण करुन ऑक्टोबर महिन्यातील पहिल्या किंवा दुसऱ्या आढवड्यात सदरचे ट्रक पुन्हा कसारा डॅम साईट येथे पाठविण्यात येत असल्याचे सांगितले. त्यांचा नमूद ट्रक उद्योग भवग, प्लॉट नं. १, जरीमरी मोहिली व्हिलेज येथे दि.०१/०६/२०११ पासून पार्किंगमध्ये उभा होता. तद्नंतर पोलिसांनी सदरचा ट्रक पार्किंगमधून जप्त करुन त्यांचा जप्त सिलेंडर तसेच कुठल्याही गॅस एजन्सीशी त्यांचा काही एक संबंध नसतांना त्यांच्या नमूद ट्रकमधून सिलेंडर जप्त करण्यात आल्याचे सांगून त्यांचे ट्रक त्यांना परत मिळण्याकरिता त्यांनी मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ११ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई येथे अर्ज केल्यानंतर त्यांना मा. न्यायालयाने दि.०३/०८/२०११ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये बंधपत्रावर परत केले. तथापी, पोलिसांनी त्यांना सदरचा ट्रक अद्याप परत केलेला नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले नाही.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ चे मालक दिपक बाबाराव जाधव यांनी युक्तीवाद केला की, त्याची गाडी बी.एम.के. कंपाऊंड जवळ पार्कींगमध्ये सतत उभी राहत असते. गाडी उभी असतांना व सदर गाडीमध्ये गाडीचा ड्रायव्हर नसतांना सुध्दा व गाडीमध्ये माल नसतांना गाडी विनाकारण पकडण्यात आली आहे. तरी वरील वस्तूस्थिती लक्षांत घेऊन सदर वाहत मुक्त करुन सोडून देण्यात यावे. कारण सदर गाडीच त्याच्या पूर्ण कुटुंबाचे उदर निर्वाहाचे साधन आहे. तसेच सदर गाडीवर बँकेचे कर्ज असल्याने त्याचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्याचे वाहन सोडून देण्यात यावे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ चे मालक शशीकांत एम. लाटे यांचे दि.३०/०८/२०११ रोजीच्या निवेदनात, त्याने त्याची गाडी क्र. एमएच-४३-एफ-२४३२ साकीनाका येथे पार्क केली होती व तो गावी गेला होता. जेव्हा तो परत आला तेव्हा त्याची गाडी विनोबा भावे नगर पोलिस ठाणे यांच्या ताब्यात होती. गाडीमध्ये गॅस कोणी ठेवले हे त्यास माहिती नाही. तरी त्याची गाडी त्यास परत करावी, अशी विनंती केली आहे.

झीग्मा गॅस सर्व्हिसचे मालक सलिम पोटिया यांचे दि.३०/०८/२०११ रोजीच्या निवेदनात, त्यांनी यापूर्वीच्या दि.०९/०८/२०११ व १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीमध्ये सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले.

लक्ष्मी गॅस सर्व्हिस यांचे दि.३०/०८/२०११ रोजीच्या निवेदनात, त्याच्या एका खास मित्राच्या शिफारसीनुसार त्याने श्री. लतिफ जलालउद्दीन खान यास कमिशन पध्दतीवर लक्ष्मी गॅस एजन्सीचे केवळ व्यावसायिक सिलेंडर वाहतूक करण्यासाठी वाहतूक कॉन्ट्रक्टर म्हणून नेमण्यात आले होते. या कामाकरिता जो सिलेंडर साठवणूककरिता जागा ने/आण करण्यासाठी वाहणे व त्याकरिता कर्मचारी हे सर्व त्याच्याकडेच देय होते. म्हणून श्री. लतिफ जलाउद्दीन खान यांचा वाहतूक कॉन्ट्रक्टर व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचा लक्ष्मी गॅस एजन्सीचा संबंध येत नाही. श्री. लतिफ जलाउद्दीन खान हा अत्यंत विश्वासू व प्रामाणिक होता. जो असे

बेकायदेशिर कृत्य करीत आहे याचा त्याला कधीही संशय आला नाही. तसेच याबाबत माहितीही मिळाली नाही. वाहतूकीकरिता ने/आण करीत असलेले (भरलेले) व खाली असलेले एच.पी. कंपनीचे एकूण १९२ व्यवसायीक गॅस सिलेंडर मालमत्तेमध्ये जप्त करण्यात आले आहे. ते लक्ष्मी गॅस कंपनीच्या मालकीचे आहेत. सदर १९२ व्यवसायीक गॅस सिलेंडर वगळता मुद्देमालामध्ये जप्त करण्यात आलेल्या इतर कोणत्याही वस्तूशी या कंपनीचा संबंध येत नाही. त्यांनी लतीफ जलालउद्दीन खान यांचा कॉन्ट्रक्ट रद्द करुन त्याची लक्ष्मी गॅस एजन्सीमधून हकालपट्टी करण्यात आलेली आहे. केवळ अंधविश्वास व निष्काळजीपणा यामुळे या प्रकरणामध्ये लक्ष्मी गॅस एजन्सीचा संबंध आलेला आहे. भविष्यात अशा प्रकारे कोणतेही गैर कृत्य होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तरी या प्रकरणी वस्तूस्थिती विचारात ठेवून उचीत निर्णय घ्यावा व एच.पी. कंपनीचे १९२ व्यवसायीक गॅस सिलेंडर लक्ष्मी गॅस एजन्सीस परत देण्याची विनंती केली आहे.

लक्ष्मी गॅस सर्व्हिस यांनी दि.२०/०९/२०११ रोजीच्या निवेदनासोबत मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांच्या बरोबर वडाळा (पूर्व) येथील सिलेंडरच्या साठवणूकीकरिता कंपनीने उपलब्ध करुन दिलेल्या गोदामाची भाडे करारनाम्याची तसेच वितरक म्हणून हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या कंपनीसोबत असलेल्या करारनाम्याची छायांकित प्रत सादर केली.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विनोबा भावे नगर पोलिस ठाणे यांचे दि.१६/०८/२०११ रोजीच्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील मालमत्ता हि घटनास्थळी केलेल्या धाडी दरम्यान तसेच आरोपीतांनी पोलिस कोठडी दरम्यान दिलेल्या निवेदनावरुन व गुन्ह्याशी संबंधित असल्याने जप्त करुन ताब्यात घेण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेल्या टेम्पो क्र.एमएच-०४-ईबी-४३७१, मो/डम्पर क्र.एमएच-०२-वायके-९७२९, टेम्पो क्र.एमएच-०३-एन-८९९७, टेम्पो क्र.एमएच-०४-डीएस-४५९२ यांच्या मालकांनी त्यांचे वाहन परत मिळणेबाबत मा. महानगर न्यायदंडाधिकारी, ५२ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई येथे अर्ज सादर केले आहे. सदर जप्त मालमत्ता ही लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस या जीवनावश्यक वस्तूशी निगडीत असल्याने सदर मालमत्तेबाबत योग्य ते आदेश होण्यास विनंती केली आहे, असे नमूद केले आहे.

दि.१८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश एम. सिंग यांनी युक्तीवाद केला की, दिनांक ०२/०७/२०११ रोजी समाजसेवा शाखेने तीन इसमांसोबत धाड टाकून नमूद ठिकाणी मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच पथकासमवेत असलेल्या तीन इसमांपैकी एक जैनुद्दीन नावाचा इसम होता व त्याने दिलेल्या जबाबानुसार त्याला अटक करण्यात आली येऊन, त्याचा थ्री व्हिलर टेम्पो व त्यामधील एच.पी. सिलेंडर जप्त करण्यात आले. ते विकास गॅस एजन्सीचे मालक असून ते एल.जी. गॅसचा व्यवहार पाहत असून त्यांचा एच.पी. शी काही संबंध नाही. तसेच सदर गुन्ह्यात त्यांच्या थ्री व्हिलर टेम्पोमध्ये पोलिसांनी एच.पी. गॅस सिलेंडर जप्त केले

आहे. सदरहू टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० या टेम्पोचा ते लोडिंग व अनलोडिंगसाठी वापर करीत असून त्यांचा एच.पी. गॅसशी काहीही संबंध नसून सदरचा टेम्पो हा मनोज एम. सिंग यांच्या मालकीचा आहे. सदर गुन्ह्यामध्ये एच.पी. सिलेंडर जप्त करण्यात आले असून ते स्वतः लिडर गॅसचे वितरक असल्याने त्यांचा इतर सिलेंडर्स वापरण्याचा प्रश्न उद्भवत नसून व्यवसायीक कारणामुळे त्यांचा बदनामी करण्याचा हेतू असल्याचे सांगून त्यांनी त्यांचे टेम्पो मुक्त करण्यास विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

या कार्यालयाच्या फिरत्या पथकास विकास गॅस एजन्सी या वितरकाकडे स्थळ भेट देवून त्यांना वितरक म्हणून प्राधिकृत केल्याचे पत्र, विस्फोटक परवाना, गॅस ग्राहकांची यादी, साठा पुस्तक इत्यादी दस्ताऐवजांची तपासणी करुन अहवाल सादर करण्याकरिता शिधावाटप निरिक्षकांची नेमणूक करण्यात आली. दिनांक २५/१०/२०११ रोजी सादर केलेल्या अहवालात व त्यासोबत विकास गॅस एजन्सीचे मालक यांनी सादर केलेल्या निवेदनांत, त्यांनी लिडर गॅस ॲण्ड पेट्रोकेम लि. या कंपनीसोबतचा दि.१८/१२/२००६ रोजीचा करारनामा सादर केला. तसेच त्यांचे स्वतःचे गोदाम नसल्याने ते लिडर गॅसच्या गाडीद्वारे सिलेंडरचे वितरण करीत असल्याचे सांगितले. या कारणास्तव त्यांनी विस्फोटकचा परवाना घेतला नसल्याचे सांगून त्यांच्याकडे घरगुती व वाणिज्य वापराचे ५५० ग्राहक असून सदर ग्राहकांचे तपशिल त्यांच्याकडे नाही. साठापुस्तक त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगून कंपनीकडून केल्या जाणाऱ्या गॅस वितरणासोबत त्यांना इनव्हाईस दिले जात असून त्यांनी जुन व जुलैचे इनव्हाईस सादर केले व त्यानंतरचे इनव्हाईस त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले.

**<u>निष्कर्ष</u> :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०२/०७/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांच्या पथकाने बि.एम.के. कंम्पाउन्ड, क्रांती नगर, महेन्द्र दोषी यांच्या गाळ्यासमोर, बैल बाजार, कुर्ला (प), मुंबई या ठिकाणी धाड टाकून शासन दराने ग्राहकांना घरगुती वापरात वितरीत होणारे गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात अवैधरित्या विनापरवाना साठा करुन सदर ठिकाणी उपस्थित इमस त्यांच्या साथीदारांसह घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाकीमधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढून सदर गॅस वॉलच्या सहाय्याने व्यावसायिक गॅस टाकीमध्ये गॅस कमी प्रमाणात भरुन सदर टाकीमध्ये पूर्ण गॅस भरलेला आहे असे भासवून सदर गॅस टाक्या ग्राहकांना विक्रीसाठी तयार करुन ठेवल्या असतांना सदर ठिकाणी घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाक्यांच्या मोठ्या प्रमाणात अवैधरित्या साठा

मिळून आल्याने संबधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एच.पी. व भारत कंपनीचे घरगुती व व्यावसायीक वापराचे गॅस सिलेंडरचा साठा, टेम्पो व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. पथकाने ताब्यात घेतलेला इसम नामे रजीउल्ला खान यांच्याकडे अधिक विचारणा केली असता, घरगुती वापरण्यात येणारे गॅस सिलेंडर तो झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी, पंतनगर, घाटकोपर, मुंबई या गॅस एजन्सीमधील डिलीव्हरी करणाऱ्या इसमाकडून प्रति किंमत रुपये ५००/- ने विकत घेत असल्याचे सांगून २५ घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरमधून गॅस काढून सदर गॅस व्यावसायीक सिलेंडरमध्ये भरुन १७ व्यावसायीक सिलेंडर तयार केले जातात. सदर तयार केलेले सिलेंडर तो वर नमूद टेम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ मधून साकीनाका येथे इसम नामे जानुउद्दीन जलाउद्दीन खान यास रुपये १०००/- या दराने विकत असल्याचे सांगून नमूद टेम्पो चालक पोलिसांना पाहून पळून गेल्याचे सांगितले. तसेच जप्त करण्यात आलेल्या एच.पी. व भारत कंपनीच्या सीलबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, सदरचे सील त्याने १ महिन्यापूर्वी फिरोज नावाच्या त्याच्या मित्राकडून विकत आणल्याचे सांगितले.

दिनांक ०३/०७/२०११ रोजी पोलिसांच्या ताब्यात असलेला इसम नामे जानुउद्दीन जलाउद्दीन खान यांनी अधिक माहिती दिल्यानुसार पोलिस पथक पंच व आरोपीसह साकीनाका, ९० फुट रोड येथील कम्पाउन्डच्या पूर्व बाजूस असलेल्या गेटजवळ असलेल्या मोकळ्या जागेत उघड्यावर ठेवण्यात आलेले गॅस सिलेंडर तसेच नमूद कम्पाउन्डच्या पूर्वेकडील भितीला लागून उभ्या असलेल्या ५ वाहनामध्ये ठेवलेले गॅस सिलेंडर दाखविले व सदरचे गॅस सिलेंडर त्याने रजीउल्ला याच्याकडून विकत घेतल्याचे पोलिस अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. पोलिसांनी सदर वरील वाहनात ठेवण्यात आलेले व मोकळ्या जागेत जमिनीवर असलेले खालील वर्णनाचे व कंपन्याचे सिलेंडर व वाहने पंचनाम्या अंतर्गत हस्तगत केले.

प्रस्तूत गुन्हयातील जामीनावर मुक्त असलेला आरोपी नामे जानुउद्दीन जलाउद्दीन खान यास दि.२१/०७/२०११ रोजी पोलिस ठाणेस बोलावून तो बनावटीकरण केलेले गॅस कोणास पुरवित होता, याबाबत तपास केला असता, त्याने सदरचे गॅस काही एच.पी. ग्राहकांना तसेच काही विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग यांना पुरवीत असलेबाबत सांगितले. सदरबाबत आरोपी नामे जानुउद्दीन खान यांचा जबाब नोंदवून जानुउद्दीन खान याचेकडून मिळालेल्या माहितीनुसार ९० फुट रोड येथील श्रीकृष्ण नगर याठिकाणी जावून विकास गॅस एजन्सीचे कार्यालयाबाबत तपास केला असता, सदर ठिकाणी गुलशन हॉटेल शेजारी असणाऱ्या गल्लीजवळ काही गॅस सिलेंडरने भरलेला एक तीन चाकी टेम्पो तसेच विकास गॅस एजन्सीचे कार्यालय दिसून आले. सदर विकास एजन्सीचे मालक अखिलेश सिंग यांना खान याने पुरविलेल्या १९ किलो वजनाच्या व्यावसायीक गॅस सिलेंडरबाबत

तपास केला असता, त्याने खान याचेकडून विक्री करण्याकरिता विकत घेतलेले रिकामे सिलेंडर दाखविल्याने दोन पंचासमक्ष पंचनामा करुन तीन चाकी टेम्पो व एच.पी. कंपनीचे व भारत गॅस कंपनीचे सिलेंडर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

झीग्मा गॅस सर्व्हिस मालक सलिम पोटिया व मॅनजेर जावेद अहमद खान यांनी केलेल्या खुलाशात, नमूद गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले ट्रक/टेम्पो तसेच घरगुती वापराचे सिलेंडर इत्यादी मुद्देमाल त्यांच्या मालकीचा नसून सदर मुद्देमालाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याने नियमानुसार कारवाई करण्यात यावी, असे नमूद केले आहे. तथापी, पोलिसांनी घटनास्थळी ताब्यात घेतलेला इसम नामे रजीउल्ला खान यांनी दिलेल्या जबाबात, घरगुती वापरण्यात येणारे गॅस सिलेंडर तो झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी, पंतनगर, घाटकोपर, मुंबई या गॅस एजन्सीमधील डिलीव्हरी करणाऱ्या इसमाकडून प्रति किंमत रुपये ५००/- ने विकत घेत असल्याचे सांगून २५ घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरमधून गॅस काढून सदरचा गॅस व्यावसायीक सिलेंडरमध्ये भरुन १७ व्यावसायीक सिलेंडर तयार करुन जानुउद्दीन जलाउद्दीन खान नामे इसमास रुपये १०००/- या दराने विकत असल्याचे सांगितले. यावरुन झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी यांच्याकडून अनुदानीत दराने वितरीत होणारे घरगुती वापराचे सिलेंडरचे वितरण प्रत्यक्षात उपभोक्ता यांना न होता. तो गैरमार्गाने व नफेखोरीच्या उद्देशाने विकला असल्याने पोलिसांनी घटनास्थळी जप्त केलेले आहे. यावरुन प्रस्तुत प्रकरणी झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी यांचाही सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

लक्ष्मी गॅस सर्व्हिस या कंपनीने केलेल्या खुलाशात, त्याच्या एका खास मित्राच्या शिफारसीनुसार त्याने लतिफ जलाउद्दीन खान यास कमिशन पध्दतीवर लक्ष्मी गॅस एजन्सीचे केवळ व्यावसायिक सिलेंडर वाहतूक करण्यासाठी वाहतूक कॉन्ट्रक्टर म्हणून नेमण्यात आले होते. या कामाकरिता जो सिलेंडर साठवणूककरिता जागा, ने/आण करण्यासाठी वाहणे व त्याकरिता कर्मचारी हे सर्व त्याच्याकडेच देय होते. म्हणून लतिफ जलाउद्दीन खान यांचा वाहतूक कॉन्ट्रक्टर व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचा लक्ष्मी गॅस एजन्सीचा संबंध येत नाही. लतिफ जलाउद्दीन खान हा अत्यंत विश्वासू व प्रामाणिक होता. जो असे बेकायदेशिर कृत्य करीत आहे याचा त्याला कधीही संशय आला नाही. तसेच याबाबत माहितीही मिळाली नाही. वाहतूकीकरिता ने/आण करीत असलेले (भरलेले) व खाली असलेले एच.पी. कंपनीचे एकूण १९२ व्यवसायीक गॅस सिलेंडर मालमत्तेमध्ये जप्त करण्यात आले आहे. ते लक्ष्मी गॅस कंपनीच्या मालकीचे आहेत. सदर १९२ व्यवसायीक गॅस सिलेंडर वगळता मुद्देमालामध्ये जप्त करण्यात आलेल्या इतर कोणत्याही वस्तूशी या कंपनीचा संबंध येत नाही. त्यांनी लतीफ जलालउद्दीन खान याचा कॉन्ट्रक्ट रद्द

करुन त्याची लक्ष्मी गॅस एजन्सीमधून हकालपट्टी करण्यात आलेली आहे. केवळ अंधविश्वास व निष्काळजीपणा यामुळे या प्रकरणामध्ये लक्ष्मी गॅस एजन्सीचा संबंध आलेला आहे. भविष्यात अशा प्रकारे कोणतेही गैर कृत्य होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तरी या प्रकरणी वस्तूस्थिती विचारात ठेवून उचीत निर्णय घ्यावा व एच.पी. कंपनीचे १९२ व्यवसायीक गॅस सिलेंडर लक्ष्मी गॅस एजन्सीस परत देण्याची विनंती केली.

तथापी, उपरोक्त नमुद १९२ व्यावसायीक गॅस सिलेंडर लक्ष्मी गॅस एजंन्सीच्या मालकीचे असल्याबाबत ते कागदोपत्री सिध्द करु शकले नाहीत. तसेच त्यांनी मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या कंपनीबरोबर वडाळा (पूर्व) येथील त्यांचे सिलेंडरच्या साठवणूकीकरिता कंपनीने उपलब्ध करुन दिलेल्या गोदामाचे करारपत्र सादर केले असले तरी पोलिसांनी सदर गुन्हयामध्ये एच.पी. व भारत या दोन्ही तेल कंपन्यांचे घरगुती तसेच व्यावसायीक वापराचे रिकामे व भरलेले सिलेंडर हे त्यांच्या वडाळा येथील नमूद गोदामातून जप्त केलेले नसून ते "बि.एम.के. कम्पाउन्ड, क्रांती नगर, महेन्द्र दोषी यांच्या गाळ्यासमोर, बैल बाजार, कुर्ला (प), मुंबई तसेच साकीनाका, ९० फुट रोड येथील कम्पाउन्डच्या पूर्व बाजूस गेटजवळ असलेल्या मोकळ्या जागेतून" जप्त केलेले आहेत. तसेच लक्ष्मी गॅस एजन्सी हे एच.पी. कंपनीचे वितरक असून जप्त करण्यात आलेले सिलेंडरच्या साठ्यामध्ये एच.पी. व भारत या दोन्ही कंपन्यांचे घरगुती तसेच व्यावसायीक वापराचे रिकामे व भरलेले सिलेंडर आढळून आले आहेत. तसेच जप्त टेम्पो/ट्रकचे मालक, चालक तसेच वॉचमन यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते लक्ष्मी गॅस एजन्सी यांचेकडे काम करीत असल्याचे सांगितल्याने, सबब, लक्ष्मी गॅस एजन्सी यांच्याकडून अनुदानीत दराने वितरीत होणारे घरगुती वापराचे सिलेंडरचे वितरण प्रत्यक्षात उपभोक्ता यांना न होता. तो गैरमार्गाने व नफेखोरीच्या उद्देशाने विकला असल्याने पोलिसांनी घटनास्थळी जप्त केलेले आहे. यावरुन प्रस्तुत प्रकरणी लक्ष्मी गॅस एजन्सी यांचाही सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश एम. सिंग यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात दिनांक ०२/०७/२०११ रोजी जैनुद्दीन नावाचा इसमाने दिलेल्या जबाबानुसार त्याला अटक करण्यात आली असुन त्याचा थ्री व्हिलर टेम्पो व त्यामधील एच.पी. सिलेंडर जप्त करण्यात आले. ते विकास गॅस एजन्सीचे मालक असून ते एल.जी. गॅसचा व्यवहार पाहत असून त्यांचा एच.पी. शी काही संबंध नाही. तसेच सदर गुन्ह्यात त्यांच्या थ्री व्हिलर टेम्पोमध्ये पोलिसांनी एच.पी. गॅस सिलेंडर जप्त केले आहे. सदरहू टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० या टेम्पोचा ते लोडिंग व अनलोडिंगसाठी वापर करीत असून त्यांचा एच.पी. गॅसशी काहीही संबंध नसून सदरचा टेम्पो हा मनोज एम. सिंग यांच्या मालकीचा आहे. सदर गुन्ह्यामध्ये एच.पी. सिलेंडर जप्त करण्यात आले असून ते स्वत: लिडर गॅसचे वितरक

असल्याने त्यांचा इतर सिलेंडर्स वापरण्याचा प्रश्न उद्‌भवत नसून व्यवसायीक कारणामुळे त्यांचा बदनामी करण्याचा हेतू असल्याचे सांगून त्यांनी त्यांचे टेम्पो मुक्त करण्यास विनंती केली.

या कार्यालयाच्या फिरत्या पथकास विकास गॅस एजन्सी या वितरकाकडे स्थळ भेट देवून दिनांक २५/१०/२०११ रोजी सादर केलेल्या अहवालात व त्यासोबत विकास गॅस एजन्सीचे मालक यांनी सादर केलेल्या निवेदनात, त्यांनी लिडर गॅस ॲण्ड पेट्रोकेम लि. या कंपनीसोबतचा दि.१८/१२/२००६ रोजीचा करारनामा सादर केला. तसेच त्यांचे स्वतःचे गोदाम नसल्याने ते लिडर गॅसच्या गाडीद्वारे सिलेंडरचे वितरण करीत असल्याचे सांगितले. या कारणास्तव त्यांनी विस्फोटकचा परवाना घेतला नसल्याचे सांगून त्यांच्याकडे घरगुती व वाणिज्य वापराचे ५५० ग्राहक असून सदर ग्राहकांचे तपशिल त्यांच्याकडे नाही. साठापुस्तक त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगून कंपनीकडून केल्या जाणाऱ्या गॅस वितरणासोबत त्यांना इनव्हाईस दिले जात असून त्यांनी जुन व जुलैचे इनव्हाईस सादर केले व त्यानंतरचे इनव्हाईस त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले.

तथापी, प्रस्तूत गुन्ह्यातील जामीनावर मुक्त असलेला आरोपी नामे जानऊद्दीन खान यास दि.२१/०७/२०११ रोजी पोलिस ठाणेस बोलावून तो बनावटीकरण केलेले गॅस कोणास पुरवित होता, याबाबत तपास केला असता, त्याने सदरचे गॅस काही एच.पी. ग्राहकांना तसेच काही विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग यांना पुरवीत असलेबाबत सांगितले. सदर ठिकाणी गुलशन हॉटेल शेजारी असणाऱ्या गल्लीजवळ काही गॅस सिलेंडरने भरलेला एक तीन चाकी टेम्पो तसेच विकास गॅस एजन्सीचे कार्यालयं दिसून आले. सदर विकास एजन्सीचे मालक अखिलेश सिंग यांना खान याने पुरविलेल्या १९ किलो वजनाच्या व्यावसायीक गॅस सिलेंडरबाबत तपास केला असता, अखिलेश सिंग यांनी पंचांसमक्ष जानुउद्दीन खान याने त्याचेकडे विक्री व वितरण करण्याकरीता दिलेल्या १९ किलो वजनाचे व्यावसायीक गॅस सिलेंडर ग्राहकांना विक्री करीत असल्याचे सांगुन विकास गॅस एजन्सीच्या ऑफीसच्या बाजुस उभा असलेला टेंम्पो क्र एमएच-०३-एन-८३१० मध्ये एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे ६ व भारत गॅस कंपनीचे १९ किलो वजनाचे रिकामे १ व्यावसायीक सिलेंडर ठेवल्याचे दाखवुन सदर टेम्पोचा सिलेंडरचे वाहतुक व विक्री करण्याकरीता वापर करीत असल्याचे सांगितले. याबाबत पोलिसांनी दोन पंचासमक्ष पंचनामा करुन तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० व त्यामधील सिलेंडर जप्त करण्यात आल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे. यावरुन विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग यांनी सादर केलेले लेखी निवेदन व घटनास्थळी दिलेला जबाब हे विसंगत असुन ते दिशाभुल करणारे आहे. लिडर गॅस या समांतर बाजारातील विनाअनुदानीत गॅस सिलेंडर एजन्सीचे वितरक असुनही घटनास्थळी त्यांच्या कडून एच पी व

भारत कंपनीचे गॅस सिलेंडर जप्त केल्याने तेही संदर गुन्हयातील इतर आरोपींशी संगनमत करुन शासनाचे वतीने पुरविले जाणारे अनुदानीत घरगुती वापराच्या सिलेंडरमधून गॅस काढून तो व्यावसायीक गॅस सिलेंडरमध्ये भरुन बेकायदेशिररित्या व नफेखोरीच्या उद्देशाने केल्या जाणा-या गैरव्यवहारात त्यांचाही सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

आरोपी याने सुनावणीच्यावेळी केलेला खुलासा व घटनास्थळी दिलेला जबाब एकमेकाशी विपर्यास्त आहे. यावरुन आरोपी यांनी सुनावणीचे वेळी दिलेले खुलासे मोघम स्वरुपाचे तसेच दिशाभुल करणारे आहे. सदर गुन्ह्यात जप्त केलेले गॅस सिलेंडर परत मिळण्याबाबत तसेच मालकी हक्काबाबत मे. लक्ष्मी गॅस एजन्सीचे मालक यांनी दावा केला असला, तरी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर्स हे त्यांच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न होत नाही व त्याबाबत त्यांनी जप्त केलेल्या गॅस सिलेंडर्सबाबत कोणतेही अधिकृत कागदपत्रे अथवा पुरावे सादर केले नसल्याने सदरचे गॅस सिलेंडर सर्व संबंधितांनी आपापसात संगणमत करुन स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने अनधिकृतपणे खरेदी/विक्री केले असल्याचे दिसून येते. यावरुन सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडरचा संपुर्ण साठा हा अवैध व अनधिकृत असल्याचे सिध्द होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेले व्यावसायीक व घरगुती वापरातील संपूर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-०२-वायए-९७२९ चे मालक शरनजीत बक्षी सिंग यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद ट्रक उद्योग भवग, प्लॉट नं. १, जरीमरी मोहिली व्हिलेज येथे दि.०१/०६/२०११ पासून पार्किंगमध्ये उभा होता. तद्नंतर पोलिसांनी सदरचा ट्रक पार्किंगमधून जप्त करुन त्यांचा जप्त सिलेंडर तसेच कुठल्याही गॅस एजन्सीशी त्यांचा काही एक संबंध नसतांना त्यांच्या नमूद ट्रकमधून सिलेंडर जप्त करण्यात आल्याचे सांगून त्यांचे ट्रक त्यांना परत मिळण्याकरिता त्यांनी मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ११ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई येथे अर्ज केल्यानंतर त्यांना मा. न्यायालयाने दि.०३/०८/२०११ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये बंधपत्रावर परत केले, असे नमूद केले आहे.

ट्रक क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ चे मालक दिपक बाबाराव जाधव यांनी केलेल्या खुलाशात, त्याची गाडी बी.एम.के. कंपाऊंड जवळ पार्कीगमध्ये सतत उभी राहत असते. गाडी उभी असतांना व सदर गाडीमध्ये गाडीचा ड्रायव्हर नसतांना सुध्दा व गाडीमध्ये माल नसतांना गाडी विनाकारण पकडण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.

तथापी, घटनास्थळी रजिउल्ला खान याने दिलेल्या जबाबात, जप्त करण्यात आलेले सिलेंडर तो टेम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ मधून साकीनाका येथे इसम नामे जानुउद्दीन जलाउद्दीन खान यास रुपये १०००/- या दराने विकत असल्याचे नमुद आहे.

टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चे मालक मुबारक अली मो. इस्माईल शेख व टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ तसेच टेम्पो क्र. एमएच-०३-एएच-१३११ चे मालक जनाउद्दीन जलाउद्दीन खान यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी सदरचे टेम्पो लक्ष्मी गॅस एजन्सी यांना भाडेतत्त्वावर दिले असल्याचे नमूद केले आहे. तथापी, घटनास्थळी रजिउल्ला खान यांनी दिलेल्या जबाबात तो जप्त करण्यात आलेले सिलेंडर जानुद्दीन जलाउद्दीन खान यास हजार रुपये दराने विकत असल्याचे नमूद असुन सदरच्या तिनही टेम्पोमध्ये एचपी व भारत कंपनीचे अवैध गॅस सिलेंडरचा साठा आढळून आला आहे.

टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ चे मालक शशीकांत एम. लाटे यांनी केलेल्या खुलाशात, त्याने त्याची गाडी साकीनाका येथे पार्क केली होती व तो गावी गेला होता. जेव्हा तो परत आला तेव्हा त्याची गाडी विनोबा भावे नगर पोलिस ठाणे यांच्या ताब्यात होती. गाडीमध्ये गॅस कोणी ठेवले हे त्यास माहिती नाही. तथापी, जानुद्दीन जलाउद्दीन खान यांनी दिलेल्या जबाबानुसार पोलिसांनी घटनास्थळी टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ मधून एच.पी. व भारत कंपनीचे भरलेले व रिकामे गॅस सिलेंडर जप्त केले आहे.

सदर गुन्ह्यात थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० या टेम्पोमधुन पोलिसांनी एच.पी. गॅस सिलेंडर जप्त केले आहे. सदरहू टेम्पोचा विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग हे लोडिंग व अनलोडिंगसाठी वापर करीत असुन सदरचा टेम्पो हा मनोज एम. सिंग यांच्या मालकीचा असल्याचे सांगितले. यावरुन सदर टेम्पोचा वापर अनधिकृत सिलेंडरच्या वाहतुकीसाठी होत असल्याचे सिध्द होत आहे. तथापी टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० चे मालक यांना संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित न राहिल्याने त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसुन त्यांना सदरचे आरोप मान्य असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

तथापी, पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकून शासन दराने ग्राहकांना घरगुती वापरात वितरीत होणारे गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात अवैधरित्या विनापरवांना साठा करुन सदर ठिकाणी उपस्थित इमस नामे रजीउल्ला खान त्याच्या साथीदारांसह घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाकीमधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढून सदर गॅस वॉलच्या सहाय्याने व्यावसायिक गॅस टाकीमध्ये गॅस कमी प्रमाणात भरुन सदर टाकीमध्ये पूर्ण गॅस भरलेला आहे असे भासवून सदर गॅस टाक्या ग्राहकांना विक्रीसाठी तयार करुन ठेवल्या असतांना सदर ठिकाणी घरगुती

HEAD OFFICE
MUMBAI

वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाक्यांच्या मोठ्या प्रमाणात मिळून आलेला अवैध साठा हा टेम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ मधून त्याने जानुउद्दीन जलाउद्दीन खान यास रुपये १०००/- या दराने विक्रत असल्याचे सांगून, तसा जबाब पोलिसांना दिलेला आहे. तद्नंतर जानुउद्दीन जलाउद्दीन खान यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार त्याने सदरचा अवैध सिलेंडर साठा, साकीनाका, ९० फुट रोड येथील कम्पाउन्डच्या पूर्व बाजूस असलेल्या गेटजवळ असलेल्या मोकळ्या जागेत उघड्यावर ठेवण्यात आलेले गॅस सिलेंडर तसेच नमूद कम्पाउन्डच्या पूर्वेकडील भितीला लागून उभ्या असलेल्या ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२, टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७, टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१३११ व टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ या वाहनामध्ये ठेवलेले गॅस सिलेंडर दाखविले व सदरचे गॅस सिलेंडर त्याने रजीउल्ला याच्याकडून विकत घेतल्याचे पोलिस अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले तसेच विकास गॅस एजन्सी चे मालक अखिलेश सिंग यांचेकडून टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० या टेम्पोमधुन पोलिसांनी एच.पी. गॅस सिलेंडर जप्त केले आहे. सदरहू टेम्पोचा विकास गॅस एजन्सीचे मालक अखिलेश सिंग हे लोडिंग व अनलोडिंगसाठी वापर करीत असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. यावरुन नमुद गुन्ह्यामध्ये घटनास्थळी जप्त करण्यात आलेले बेकायदेशिररित्या साठवणूक केलेले घरगुती व वाणिज्य वापराचे सिलेंडरच्या साठ्याची अवैध वाहतुकीकरीता वर नमुद सात ट्रक / टेम्पोचा वापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

उपरोक्त नमुद जप्त करण्यात आलेल्या ट्रक/टेम्पो पैकी ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९ हे मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ११ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई येथे अर्ज केल्यानंतर त्यांना मा. न्यायालयाने दि.०३/०८/२०११ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये बंधपत्रावर परत केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी उर्वरीत टेम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ व टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ या तीनही टेम्पोच्या मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, तसेच टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० चे मालक यांना पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित न राहिल्याने त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसुन त्यांना सदरचे आरोप मान्य असल्याचे तसेच सदरचे सर्व टेम्पोचा वापर बेकायदेशीर व अनधिकृत सिलेंडर साठयाच्या वाहतुकीकरीता होत असल्याचे सिध्द होत असुन प्रस्तुत प्रकरणी जरी टेम्पो मालकांच्या अपरोक्ष सदरचा गुन्हा घडला असला तरी, मालक या नात्याने त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ व टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१३११ चे मालक जनाउद्दीन जलाउद्दीन खान यांचा सदर गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे सिध्द होत आहे.

सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेले उर्वरीत टेम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२, टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७, टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१३११, टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ व टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० हे त्यांच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे टेम्पो त्यांच्या मालकांस परत करण्याच्या अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये विनोबा भावे पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०५/२०११, दिनांक ०२/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश :-</u>

१) जप्त करण्यात आलेला टेंम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१, टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२, टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२, जीप क्र. एमएचं-०३-अेएच-१३११, टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ व तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० हे वाहने शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहने त्यांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास त्यांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. अथवा वाहन मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

२) जप्त करण्यात आलेले एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले ८९ व्यावसायीक सिलेंडर, १९ किलो वजनाचे रिकामे १०१ व्यावसायीक सिलेंडर, ४७ किलो वजनाचे रिकामे १० व्यावसायीक गॅस सिलेंडर, भारत कंपनीचे १९ किलो वजनाचा भरलेले ७ व्यावसायीक सिलेंडर, १९ किलो वजनाचे

रिकामे १८ व्यावसायीक सिलेंडर, एच.पी. कंपनीचे १४ किलो वजनाचे रिकामे ३१ घरगुती गॅस सिलेंडर, 021
१४ किलो वजनाचे भरलेले १३ घरगुती गॅस सिलेंडर चा असा संपुर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासन जमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई याना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

४) जप्त करण्यात आलेले १५ नग लोखंडी वॉल (नोझल), ५० नग एच.पी. कंपनीचे प्लास्टिक पेपरचे सिल, २ नग वजन काटे, दोन बर्नल असलेली १ शेगडी १ रेग्युलेटर व १ पाईप इ. वस्तुची पोलसानी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) रजीउल्ला एनउल्ला खान
२) अग्याराम रामलखन बिमल
३) सोहेल शमीम खान
४) झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी, पंतनगर, घाटकोपर, मुंबई या गॅस एजन्सीमधील डिलीव्हरी करणारा इसम
५) झीग्मा एच.पी. गॅस एजन्सी, पंतनगर, घाटकोपर, मुंबई या गॅस एजन्सीचे मालक
६) जनाउद्दीन जलाउद्दीन खान
७) फिरोज
८) लतीफ जलालउद्दीन खान, गॅस डिलीव्हरी करणारा इसम
९) कासम मोहम्मद खान, गॅस डिलीव्हरी करणारा इसम तसेच टेम्पो क्र.एमएच-०४-डिएस-४५९२ चे चालक
१०) अयुब राजमोहम्मद खान, कॅशियर
११) सलीफ हाजीभाई मुलतानी
१२) टेंम्पो क्र. एमएच-०४-ईबी-४३७१ चे मालक

१३) टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-२४३२ चे मालक

१४) टेम्पो क्र. एमएच-०४-डिएस-४५९२ चे मालक

१५) टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८९९७ चे मालक

१६) टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१३११ चे मालक

१७) ट्रक क्र. एमएच-०२-वायअे-९७२९ चे मालक

१८) लक्ष्मी गॅस एजन्सीचे मालक

१९) अखिलेश सिंग, विकास गॅस एजन्सीचे मालक

२०) तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८३१० चे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विनोबा भावे नगर पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विनोबा भावे नगर पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डी-मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई १० यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.



0022